# महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी संदेश विभाग, पुणे
## प्रसिध्दीपत्रक माहे ऑक्टोबर - २०१७

**क्र.क / ५ / प्रसिद्धीपत्रक / १० / २०१७** **दिनांक :- १० / ११ /२०१७**

**१. नेमणूक / सेवासमाप्ती :- निरंक**

**2. पदोन्नती / पदावनती :-**

**1.** या कार्यालयाचे आदेश जा.क्र. ई-5/ यंचा ते प्रयंचा पदोन्नती/ 2017 /1719 दि. 30/03/2017 चे आदेशान्वये यंत्रचालक ते प्रमुख यंत्रचालक, या पदावर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत. सदर पदोन्नतीच्या आदेशामध्ये खालील नमूद यंत्रचालक यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या ठिकाणामध्ये बदल करण्याबाबत विनंती अर्ज सादर केले. सदर अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या कौटुंबिक अडचणी नमूद करुन समक्ष कथन केल्याने पोलीस आस्थापना मंडळाने त्यांच्या विनंतीचा विचार करुन सदरील आदेशामध्ये त्यांच्या पदोन्नती बदलीच्या ठिकाणामध्ये खालीलप्रमाणे अंशतः बदल करणेत येत आहे.

| अ. क्र. | यंचा/पोहवा यांचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण / आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणुकीचे ठिकाण / आस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष गुलाबराव कोळी | समादेशक रारापोबल गट क्र.1 पुणे | पोलीस आयुक्त सोलापूर शहर **ऐवजी** पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण | त्यांचे विनंतीवरुन रिक्त पदी |
| 2 | प्रविण आण्णासाहेब लगड | समादेशक रारापोबल गट क्र.1 पुणे | समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.6 धुळे **ऐवजी** पोलीस अधीक्षक रायगड | त्यांचे विनंतीवरुन रिक्त पदी |

उपरोक्त कर्मचारी यांची त्यांचे विनंती नुसार पदोन्नतीच्या ठिकाणामध्ये बदल करण्यात आल्याने त्यांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. तसेच ते पदोन्नतीवर ज्या दिवशी हजर होतील तो त्यांचा सेवाज्येष्ठता दिनांक धरण्यात येईल. तसे त्यांचेकडून लेखी हमीपत्र प्राप्त करुन घेऊन ते पत्र त्यांचे सेवापस्तकात डकवून त्या हमी पत्राची एक प्रत इकडील कार्यालयास सादर करावी. या कार्यालयाचे उपरोक्त नमूद आदेशामधील उर्वरीत अटी लागु राहतील.

तरी उपरोक्त प्रमुख यंत्रचालक यांना त्यांच्या नावासमोर नमूद पदोन्नतीचे ठिकाणी कार्यमुक्त करुन, कार्यमुक्त केलेचा दिनांक व बदलीचे ठिकाणी हजर झालेचा दिनांक या कार्यालयास उलट टपाली कळवावा.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -०५/यंचा ते प्रयंचा पदोन्नती / अं.बदल /२०१७/ ५०७६ दि. ०७/१०/२०१७).**

**2.** या कार्यालयाचे आदेश क्र. ई - 04 /पदोन्नती / पोना (कम) ते पोहवा (कम) / 2017/4415 दिनांक 31/08/2017 आदेशान्वये पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) रत्नाकर दामोदर नारनवरे नेमणुक बि.सं.वि. गडचिरोली यांची पोलीस हवालदार (कर्मशाळा मदतनीस) पदावर पदोन्नतीने पदस्थापना पोलीस आयुक्त ठाणे शहर यांचे आस्थापनेवर करण्यात आलेली होती. तथापि श्री.नारनवरे यांनी दिनांक 07/09/2017 चे अर्जानुसार त्यांचे मुलीचे 10 वीचे शिक्षण चालू असून, शैक्षणिक अडचणीचे कारणास्तव त्यांची पदोन्नतीवर ठाणे शहर ऐवजी औरंगाबाद

शहर अशी पदोन्नती होण्यास विनंती केली आहे. सदर विनंती विचारात घेऊन, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील तरतूदीनुसार या कार्यालयाचे संदर्भाधीन दि. 31/08/2017 चे आदेशात अशंतः बदल करुन श्री. नारनवरे यांची सुधारीत पदस्थापना पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांचे आस्थापनेवर रिक्त असलेल्या पोलीस हवालदार (कर्मशाळा मदतनीस) पदावर करण्यात येत आहे. त्याप्रमाणे श्री. नारनवरे यांना पदोन्नतीवर सुधारीत पदस्थापनेच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याचा दिनांक व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -०४/पदोन्नती/पोना (कम) ते पोहवा (कम) /२०१७/ ५०९९ दि. ०९/१०/२०१७).**

**3.** या कार्यालयाचे आदेश क्र. ई- 04 /पदोन्नती / पोशि (कम ) ते पोना (कम)/ 2017/4416 दिनांक 31/08/2017 आदेशान्वये पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) विजय कृष्णाजी गोंदोळे नेमणुक बि.सं.वि. गडचिरोली यांची पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) पदावर पदोन्नतीने पदस्थापना पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे आस्थापनेवर करण्यात आलेली होती. तथापि श्री.गोंदोळे यांनी दिनांक 17/09/2017 च्या अर्जान्वये त्यांचा मुलगा नागपुर येथे अभियांत्रिकी व मुलगी 10 वी चे शिक्षण घेत असून त्यांचे शैक्षणिक व कौटुबिंक अडचणीचे कारणास्तव नागपूर परिक्षेत्रात रिक्त पदामध्ये पदोन्नतीची विनंती केली आहे. सदर विनंती विचारात घेऊन महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील तरतूदीनुसार या कार्यालयाचे संदर्भाधीन दि .31/08/2017 चे आदेशात अशंतः बदल करुन, श्री. गोंदोळे यांची सुधारीत पदस्थापना पोलीस अधिक्षक, भंडारा यांचे आस्थापनेवर रिक्त असलेल्या पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) पदावर करण्यात येत आहे. त्याप्रमाणे श्री.गोंदोळे यांना सुधारीत पदस्थापनेच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याचा दिनांक व पदोन्नतीवर हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -०४/पदोन्नती/पोशि (कम) ते पोना (कम) /गोंदोळे/२०१७/५१६८ दि. ११/१०/२०१७).**

**४.** या कार्यालयाचे आदेश क्र. ई - ०४ /पदोन्नती/ पोशि (कम) ते पोना (कम) /२०१७/ ४४१६ दिनांक ३१/०८/२०१७ अन्वये, पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) पदावर पदोन्नती देण्यात आलेल्या खालील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस ) यांनी पदोन्नती ठिकाणामध्ये बदल करणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात येत असुन , त्यांनी सर्वसाधारण बदल्या - २०१८ मध्ये पुन्हा अर्ज सादर करावेत. त्यांच्या बदल्या प्रशासकीय दृष्ट्या शक्य असल्यासच त्यांचे विनंतीचा विचार करण्यात येईल.

| अ.क्र. | पोशि (कर्मशाळा मदतनीस) यांचे नाव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण / आस्थापना |
|---|---|---|
| १ | श्री. रविंद्र काशिनाथ पाटील | पोलीस अधिक्षक, नंदूरबार |
| २ | श्री. कामराज उध्दवराव चांदेकर | पोलीस अधिक्षक, गडचिरोली |
| ३ | श्री.शेख हैदर मो.पाशा | पोलीस अधिक्षक,गडचिरोली |
| ४. | श्री.विठ्ठल बुधाजी शेंडे | पोलीस अधिक्षक, गडचिरोली |
| ५. | श्री. भोजराज पांडुरंग वाढई | पोलीस अधिक्षक, गडचिरोली |
| ६. | श्री. रुमाचंद केदार कुमरे | पोलीस अधिक्षक, गडचिरोली |
| ७. | श्री.राजेंद्र मुरलीधर अरमरकर | पोलीस आयुक्त, नागपूर शहर |
| ८. | श्री.पंडीत गंगाधर तारे | पोलीस अधिक्षक, परभणी |
| ९. | श्री.अशोक नारायण कोमटी | पोलीस आयुक्त, नागपूर शहर |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई - ०४ / पदोन्नती / पोशि (कम) ते पोना (कम) /अंशतः बदल /२०१७/ ५१६५ दि.११/१०/२०१७).**

**पदावनतीः-**

**1.** या कार्यालयाचे आदेश जा.क्र. ई -5 / यंचा-प्रयंचा पदोन्नती /5682/2015 दि. 02/07/2015 आदेशान्वये खालील नमूद कर्मचारी यांची पोलीस हवालदार यंत्रचालक ते सहा.पोलीस उप निरीक्षक (प्रमुख यंत्रचालक ) या पदावर पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र. पोमसं /14 - अ/ 67/एमएन/129/2014 दि. 01/09/2017 च्या परिपत्रकातील निर्देशाप्रमाणे जात वैधता प्रमाणपत्र नसतांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली होती.सदर चे परिपत्रक, पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र. पोमसं /14 - अ/ 67/एमएन/129/2014 दि. 21/07/2016 परिपत्रकान्वये रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे पदोन्नती आदेशात आणि या कार्यालयाचे जा.क्र. ई/प्रलि - 2/जा.वै./पदोन्नती/अधि-कर्म/2016-5172 दि. 16/08/2016 अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत संबंधीत कर्मचारी यांना कळविण्यात येऊन ही त्यांनी अद्याप पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही.

खालील नमूद कर्मचारी यांना **सहा पोउपनि बिसं (प्रमुख यंत्रचालक** ) पदी दिलेली तात्पुरती पदोन्नती संपुष्टात आणून **पोलीस हवालदार (यंत्रचालक)** या पदावर खालील नमूद ठिकाणी पदावनत करुन पदस्थापना करण्यात येत आहे.:-

| अ क्र | पोउपनि यांचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण / आस्थापना | पदावनतीनंतर पोलीस हवालदार (यंत्रचालक) पदावरील नेमणुकीचे ठिकाण / | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | ए.एम.बावलेकर(म्हस्के) सपोउनि/प्रयंचा | मुंबई शहर<br>पोलीस उप आयुक्त<br>बि.सं.मुंबई शहर | मुंबई शहर<br>पोलीस उप आयुक्त<br>बि.सं.मुंबई शहर | रिक्त पदी |
| 2 | सी.व्ही.मोरे सपोउनि/प्रयंचा | गट क्र.5 दौंड<br>समादेशक, रा.रा.पो. बल<br>गट क्र.5 दौंड | गट क्र.5 दौंड<br>समादेशक, रा.रा.पो. बल<br>गट क्र.5 दौंड | रिक्त पदी |
| 3 | डी.जी.सुर्यवंशी (सेवानिवृत्त सपोउनि/प्रयंचा दि.31/07/2017) | गट क्र.4 नागपूर<br>समादेशक, रा.रा.पो. बल<br>गट क्र.4 नागपुर | गट क्र.4 नागपूर<br>समादेशक, रा.रा.पो. बल<br>गट क्र.4 नागपुर | दि.31/07/2017 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. |
| 4 | जी.सी.जावळे सपोउनि/प्रयंचा | मुंबई शहर<br>पोलीस उप आयुक्त<br>बि.सं.मुंबई शहर | गडचिरोली<br>पोलीस अधीक्षक<br>गडचिरोली | रिक्त पदी |

2. उपरोक्त कर्मचारी यांना पदावनीतीवर बदलीचे ठिकाणी सदरील आदेश प्राप्त होतील **त्याच दिवशी कार्यमुक्त** करुन त्यांचे कार्यमुक्त केलेचा दिनांक तसेच सदरील आदेश त्यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदर दुय्यम प्रत इकडील कार्यालयास सादर करावी. तसेच सदर कर्मचारी पदावनतीवर हजर झालेचा दिनांक या कार्यालयास उलट टपाली कळवावा ही विनंती .
3. सपोउनि प्रयंचा श्री डी.जी.सुर्यवंशी नेमणुक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.4 नागपूर हे दिनांक 31/07/2017 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना या आदेशान्वये पदावनत करण्यात येत आहे.त्यानुसार त्यांची पोलीस हवालदार (यंत्रचालक) या पदावरील वेतन निश्चिती करण्यात यावी.
4. वरील नमूद पोलीस हवालदार यंत्रचालक यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय /परिपत्रकानुसार त्यांची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात येऊन सेवाज्येष्ठतेने व संवर्ग निहाय रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि प्रचलीत नियमानुसार त्यांच्या पदोन्नतीचा विचार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

5. पदावनती नंतर वेतननिश्चिती करतांना पदोन्नतीपूर्वी पोलीस हवालदार यंत्रचालक वेतनश्रेणीत काल्पनिक वेतनवाढी देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी.जात वैधता प्रमापणपत्र नसल्याने कालबध्द पदोन्नती/आश्वसित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई - ०५/ प्रयंचा ते यंचा/ पदावनत /२०१७/ ५०८६ दि. ०९/१०/२०१७).**

**३. सेवानिवृत्ती / स्वेच्छासेवानिवृत्ती :- निरंक**

**४. बदली :- निरंक**

**५. बक्षिस :-**

१. कामगिरीचा तपशील :- खालील नमूद कर्मचारी यांनी पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र. पोमसं /३३/ ७१२५ / अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके २०१८-१९/३६/२०१७ दि.२३/०६/२०१७ अन्वये संचालक कार्यालयाचे सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे २०५५ पोलीस १०९(००)(१) जिल्हा पोलीस दल २०५५०१६८ या लेखाशिर्षाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करुन, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विहित वेळेत सादर केलेबाबत त्यांना प्रोत्साहनपर मानधन मंजूर करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **नांव** | **हु-I** | **नेमणूकीचे ठिकाण** | **बक्षिस रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.एस.एन.माळवदे | सपोउनि/ प्रयंचा १९४३ | मुंबई शहर | रु.१,०००/- व जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई/७/७०६/बक्षिस/२०१७/ ५०७८ दि. ०७/१०/२०१७).**

२. कामगिरीचा तपशील:- सन २००१-०५, २००५-१० व २०११-२०१७ अशा टप्पांमध्ये बिनतारी संदेश विभागातील खरेदी करण्यात आलेल्या साधनसामुग्रीची वर्गवारी करुन, वर्षनिहाय खरेदी संख्या , त्यावर झालेला खर्च याबाबत तपशिलवार तक्ते तयार करणे, सदर तक्त्यांचे सादरीकरण स्वरुपात रुपांतर करणे तसेच बिनतारी संदेश विभागाची माहिती पुर्ण केलेले प्रकल्प व प्रस्तावित योजना/प्रकल्प तसेच मुंबई शहर रेडिओ ट्रकिंग यंत्रणे संदर्भातील तांत्रिक बाबी, प्रकल्पाचा खर्च विषयक आढावा या सर्व बाबींचे सादरीकरण तयार करणेचे कामकाज खालील नमूद अधिकारी/कर्मचारी यांनी मेहनतीने पूर्ण करुन दि. २१/०८/२०१७ रोजी पोलीस महासंचालक कार्यालय, येथे सादरीकरण करणे संदर्भात आवश्यक ती कार्यवाही घेतलेबाबत त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **नांव** | **हु-I** | **नेमणूकीचे ठिकाण** | **बक्षिस रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.कि.मु.अत्रे | पोउपनिबिसं (अभि ) | व्ही-सॅट,पुणे | रु.१७५०/- व सी नोट |
| ०२ | श्री.एस.ए.मंडलीक | पोहवा / बियंचा | गोनपायो, पुणे | रु.२५०/- व जीएसटी |

३. कामगिरीचा तपशील :- बिनतारी विभागाच्या प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेपासूनचा इतिहास, पार्श्वभुमी, प्रशिक्षण केंद्राची उद्दीष्टे, यापूर्वी आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षणाबाबतचा तपशिल, प्रशिक्षण केंद्राचे दैनंदिन कार्यक्रमा संदर्भातील माहिती, प्रशिक्षण वर्ग, प्रशिक्षणामध्ये अंतर्भूत विषयांबाबतचा तपशिल, भविष्यकालीन प्रशिक्षण विषयक आराखडा इत्यादीचे अनुषंगाने सादरीकरण तयार करण्याचे कामकाज केले व दि. १३/०९/२०१७ रोजी पोलीस महासंचालक कार्यालय येथे सादरीकरण करणेसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही घेतलेबाबत खालील नमूद अधिकारी यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **नांव** | **हु-I** | **नेमणूकीचे ठिकाण** | **बक्षिस रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.कि.मु.अत्रे | पोउपनि बिसं (अभि) | व्ही-सॅट, पुणे | रु.१५००/- व सी नोट |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई/७ /७०६ /बक्षिस /२०१७/ ५३०४ दि. १८/१०/२०१७).**

४. कामगिरीचा तपशील :- शासन निर्देशानुसार बिनतारी विभागातील राज्य पोलीस सेवेतील अधिकारी यांचे सन २०१६-१७ या कालावधीतल गोपनीय अहवाल वरीष्ठांच्या सुचनांनुसार संगणक प्रणालीमध्ये योग्यरितीने

विहित कालावधीत संबंधित कार्यासनकडे सादर करणेची उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत खालील नमूद कर्मचारी यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **नांव** | **हु-1** | **नेमणूकीचे ठिकाण** | **बक्षिस रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.एस.ए.मंडलीक | पोहवा / बियंचा | गो.न.पा.यो. पुणे | रु.२५०/- व जीएसटी |
| ०२ | श्री.आर.व्ही.शहाणे | पोहवा / बियंचा | गो.न.पा.यो. पुणे | रु.२५०/-व जीएसटी |

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई / ७ / ७०६ / बक्षिस / २०१७ / ५४२२ दि. २७/१०/२०१७ )**

**६. शिक्षा :- निरंक**

**७. निधनः- निरंक**

**८. संकीर्ण:- निरंक**

दिनांक : १० /११/२०१७

SD/-
**( सी.ए.ढाकणे )**
**पोलीस अधीक्षक, बि.सं. (मुख्या),**
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, म.रा.पुणे, कार्यालय